By Post

शिक्षण शुल्क समिती
आवक क्र. 21788
22 NOV 2012
दिनांक

व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना वाढीव शिक्षण शुल्काच्या आकारणीबाबत.

महाराष्ट्र शासन
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
शासन निर्णय क्र:संकीर्ण-२०१२/प्र.क्र.५२/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ४०० ०३२
दिनांक : ७ नोव्हेंबर, २०१२

वाचा :- १) शासन पत्र, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. बैठक २०११/(९३/ २०११) / तांशि-४ दिनांक १२.५.२०११ व त्यासोबतचे दि. ३.५.२०१२ च्या बैठकीचे इतिवृत्त.
२) शिक्षण शुल्क समितीने दिनांक २४.३.२०११ रोजी घेतलेला निर्णय.
३) शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांचे पत्र क्र. SSS (H.&T.) /Extract/19th June 12/2012/2820 dt. 22-06-2012.

**प्रस्तावना** :- मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उच्च व तंत्रशिक्षण विभाग, तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अखत्यारित असणा-या सर्व अभ्यासक्रमांच्या खाजगी विना अनुदानित शिक्षण संस्थांचे शिक्षण शुल्क सुनिश्चित करण्यासाठी दिनांक २४.९.२००३ च्या आदेशान्वये शिक्षण शुल्क समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. या समितीचे अध्यक्ष मा. उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश आहेत. व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेशाच्या वेळी जे विशिष्ट शिक्षण शुल्क निर्धारित करण्यात येते त्या शिक्षण शुल्कामध्ये दरवर्षी वाढ होत असते. वाढीव शिक्षण शुल्क किती असावे हे शिक्षण शुल्क समितीमार्फत सुनिश्चित करण्यात येते. राज्यशासनाच्या शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत सदर शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती त्या त्या प्रशासकीय विभागामार्फत करण्यात येते. या पार्श्वभूमीवर शिक्षण शुल्क समितीने त्यांच्या दिनांक २४.३.२०११ च्या बैठकीत तसेच दिनांक १९.६.२०१२ च्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २००९-१० मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्कात ७ टक्के एवढी फी वाढ करण्याचा निर्णय शिक्षण शुल्क समितीने घेतलेला आहे. त्यानुसार शासन निर्णय निर्गमित करावयाची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीत येणा-या शिक्षण शुल्क समितीमार्फत खाजगी संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चित करण्यात येते. अशा अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना त्यापुढील शैक्षणिक वर्षी ७ टक्क्यांनी वाढीव शिक्षण शुल्क भरणे आवश्यक राहील. ही दरवाढ अभ्यासक्रमाच्या पूर्ण कालावधीसाठी लागू राहील.

उदाहरण :- समजा सन २००९-१० करिता रु. १,००,०००/- (रुपये एक लाख) आहे व अभ्यासक्रम चार वर्षाचा आहे तर सन २०१०-११, २०११-१२ व २०१२-१३ या कालावधीसाठी

दरवर्षी रु. १,०७,०००/- (रुपये एक लाख सात हजार) इतके शिक्षण शुल्क आकारण्यात येईल.

२. त्यानुसार शासनाने सामाजिक मागास तसेच आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी लागू केलेल्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग, आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग या विभागांनी शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती संबंधित संस्थेकडे करताना वाढीव प्रमाणात ७ टक्के एवढे शिक्षण शुल्क अदा करणे आवश्यक राहील.

३. सदरहू आदेश शिक्षण शुल्क समितीच्या पूर्वसहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१२११०७१५३२२००४०८ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

(म. मा. मोरवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यापालांचे सचिव, राजभवन मुंबई
मा. मुख्यमंत्र्याचे सचिव, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालयान सचिव, शिक्षण शुल्क समिती, शासकीय तंत्र निकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
अध्यक्ष, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ अनएडेड इंजिनियरींग कॉलेजेस, महाराष्ट्र, हिराबाई हरीदास विद्यानगरी, अमृत धाम, पंचवटी, नाशिक - ४२२००३
आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य,नाशिक
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त कार्यालय, १ला मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मुंबई – ४०००३२ (पत्राने)
कुलगुरु, सर्व विद्यापीठे
सहसंचालक, तंत्रशिक्षण (सर्व)
अप्पर आयुक्त, आदिवासी विकास (सर्व)
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनाय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांचे स्वीय सहायक
निवड नस्ती/तांशि-४